बेलिंगहॅमच्या अलौकिक कौशल्याने इंग्लंडला तारले!

स्लोव्हाकियाला नमवत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश

वृत्तसंस्था, गेल्सेनकिर्चेन

ज्युड बेलिंगहॅमच्या अलौकिक कौशल्यामुळे रविवारी इंग्लंडला युरो अजिंक्यपद फुटबॉल स्पर्धेतील आपले आव्हान कायम राखता आले. भरपाई वेळेत बेलिंगहॅम आणि त्यानंतर अतिरिक्त वेळेतील पहिल्याच मिनिटाला कर्णधार हॅरी केनने केलेल्या गोलमुळे इंग्लंडने स्लोव्हाकियाचा २-१ असा पराभव करून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. इंग्लंडची गाठ आता स्वित्झर्लंडशी पडणार आहे.

इंग्लंडचा खेळ पुन्हा एकदा निराशाजनक झाला. त्यांच्या खेळात विश्वासाचा अभाव होता. स्लोव्हाकियाने सामन्याला धारदार सुरुवात केली. २५व्या मिनिटाला इव्हान श्रांझने स्लोव्हाकियाला आघाडीवर नेले. स्लोव्हाकियाचा हा धोक्याचा इशारा इंग्लंड समजू शकले नाहीत. उत्तरार्धात फिल फोडेनने गोल केला. मात्र, पास स्वीकारण्यापूर्वी तो 'ऑफ-साइड' असल्याने पंचांनी गोल अपात्र ठरवला.

इंग्लंडला गोलसाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागत होती. ९० मिनिटांनंतरचा भरपाई वेळही संपत चालला होता. इंग्लंडच्या चाहत्यांचा धीर सुटत चालला होता. अखेर सामना संपण्यास केवळ ३० सेकंदांचा अवधी असताना थ्रो-इनवर खोलवर आलेला चेंडू बेलिंगहॅमने 'बायसिकल किक' मारत गोलजाळीत धाडला आणि इंग्लंडला बरोबरी साधता आली. सामना ३० मिनिटांच्या अतिरिक्त वेळेत नेण्यात त्यांना यश आले. दोनच दिवसांपूर्वी २१व्या वर्षात पदार्पण करणाऱ्या बेलिंगहॅमने आपला वाढदिवस असा अनोखा साजरा केला.

अतिरिक्त वेळेत पहिल्याच मिनिटाला आलेल्या क्रॉसवर केनने हेडर मारून गोल करताना इंग्लंडला आघाडी मिळवून दिली आणि इंग्लंडच्या खेळाडूंनी जोरदार जल्लोष केला. केनचा इंग्लंडसाठी हा ६५वा गोल ठरला. अतिरिक्त वेळेच्या मध्यंतराला सामना थांबण्यापूर्वी काही क्षण आधी इंग्लंडच्या काळजाचा ठोका पुन्हा एकदा चुकला. चेंडूला दिशा देण्याच्या पीटर पेकरिकच्या धोकादायक प्रयत्नात चेंडू गोलपोस्टला धडकून बाहेर गेला. त्यानंतर मात्र इंग्लंडने सामना हातातून निसटणार नाही याची काळजी घेतली.

स्पेनकडून जॉर्जियाचा स्वप्नभंग

कोलोन : तीन वेळच्या विजेत्या स्पेनने रविवारी उत्साही जॉर्जियावर ४-१ असा मोठा विजय मिळवताना युरो अजिंक्यपद फुटबॉल स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीतील आपले स्थान निश्चित केले. या पराभवामुळे प्रथमच युरो स्पर्धेत खेळताना बाद फेरी गाठणाऱ्या जॉर्जियाची स्वप्नवत घोडदौड थांबली. स्पेनची गाठ आता तुल्यबळ जर्मनीशी पडणार असून, दोन संभाव्य विजेत्यांमधील लढत म्हणूनच या सामन्याकडे पाहिले जाईल.

रिमझिम पावसात झालेल्या या सामन्यात रॉड्री (३९व्या मिनिटाला), फॅबियन रुईज (५१व्या मि.), निको विल्यम्स (७५व्या मि.) आणि डॅनी ओल्मो (८३व्या मि.) यांनी गोल करून स्पेनचा विजय साकारला. या मोठ्या विजयासह स्पेनने जर्मनीला जणू सावधानतेचा इशाराही दिला.

अखेरच्या साखळी सामन्यात पोर्तुगालवर २-० असा विजय मिळवून जॉर्जियाने सनसनाटी निर्माण केली होती. मात्र, बाद फेरीत त्या निकालाची पुनरावृत्ती करण्यात त्यांना अपयश आले. या सामन्यापूर्वी स्पर्धेत एकही गोल न स्वीकारलेल्या स्पेनविरुद्ध गोल करण्याचेच समाधान जॉर्जियाला लाभले. मात्र, उत्तरार्धात स्पेनची धारदार आक्रमणे परतवण्यात जॉर्जियाला अपयश आले.

भारतीय महिला संघाकडून दक्षिण आफ्रिकेचा प्रतिकार मोडीत!

चेन्नई : कर्णधार लॉरा वोल्व्हार्ड (३१४ चेंडूंत १२२ धावा) आणि दक्षिण आफ्रिकेच्या अन्य फलंदाजांचा प्रतिकार मोडून काढताना भारतीय महिला संघाने एकमेव कसोटी क्रिकेट सामन्यात १० गडी राखून सरशी साधली. ऑफ-स्पिनर स्नेह राणाने दोन डावांत मिळून १० गडी बाद करत सामन्यातील सर्वोत्तम खेळाडूचा पुरस्कार आपल्या नावे केला.

सोमवारी, कसोटीच्या चौथ्या आणि अखेरच्या दिवशी, २ बाद २३२ धावांवरून पुढे खेळण्यास सुरुवात केलेल्या दक्षिण आफ्रिकेचा दुसरा डाव १५४.४ षटकांत ३७३ धावांवर संपुष्टात आला. विजयासाठी भारताला ३७ धावांचे माफक आव्हान मिळाले, जे त्यांनी एकही गडी न गमावता ९.२ षटकांत पूर्ण केले. पहिल्या डावातील द्विशतकवीर शफाली वर्मा २४ धावांवर, तर शुभा सतीश १३ धावांवर नाबाद राहिली.

अनुभवी खेळाडू उपलब्ध - शहा

ब्रिजटाऊन : रोहित शर्मा, विराट कोहली आणि रवींद्र जडेजा या अनुभवी खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय ट्वेन्टी-२० क्रिकेटला अलविदा केले. मात्र, पुढील वर्षी होणारी चॅम्पियन्स करंडक स्पर्धा आणि जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेसाठी भारताचे सर्व अनुभवी खेळाडू उपलब्ध असतील, असा विश्वास 'बीसीसीआय'चे सचिव जय शहा यांनी व्यक्त केला.

''भारतीय संघाची वाटचाल पाहता, चॅम्पियन्स करंडक आणि जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धा जिंकण्याचे आमचे ध्येय आहे. या स्पर्धांसाठी सर्व अनुभवी खेळाडू उपलब्ध असतील,'' असे शहा सोमवारी म्हणाले.

व्हेनेझुएलाचे गटात निर्विवाद वर्चस्व

ऑस्टिन (अमेरिका) : उत्तरार्धात नोंदवलेल्या तीन गोलच्या जोरावर व्हेनेझुएलाने कोपा अमेरिका फुटबॉल स्पर्धेत सोमवारी जमैकाचा ३-० असा पराभव करताना ब-गटात निर्विवाद वर्चस्व राखले. या विजयाने व्हेनेझुएला गटात अव्वल स्थानावर आले असून, उपांत्यपूर्व फेरीत त्यांची गाठ आता कॅनडाशी पडणार आहे.

बुद्धिबळ जगज्जेतेपदाची लढत सिंगापूरमध्ये

नवी दिल्ली : भारताचा डी. गुकेश आणि विद्यमान जगज्जेता चीनचा डिंग लिरेन यांच्यातील जागतिक अजिंक्यपदाची लढत सिंगापूरमध्ये खेळवण्यात येणार असल्याची घोषणा 'फिडे'ने सोमवारी केली. चेन्नई आणि नवी दिल्लीला या प्रतिष्ठेच्या लढतीचे यजमानपद मिळवण्यात अपयश आले.

बुद्धिबळ जगज्जेतेपदाची लढत मायदेशात खेळण्याबाबत गुकेश आशावादी होता. अखिल भारतीय बुद्धिबळ महासंघ (एआयसीएफ) दिल्लीत, तर तमिळनाडू सरकार चेन्नईमध्ये या लढतीचे आयोजन करण्यास उत्सुक होते. अखेर दोन्ही शहरांना मागे टाकून सिंगापूरने यजमानपदाचा मान मिळवला. ही लढत २० नोव्हेंबर ते १५ डिसेंबर या कालावधीत खेळवली जाणार आहे.

''सिंगापूर सरकारच्या पाठिंब्यासह सिंगापूर बुद्धिबळ महासंघाने जागतिक अजिंक्यपद बुद्धिबळ लढतीच्या यजमानपदासाठी केलेली दावेदारी स्वीकारण्यात आली आहे. सर्व दावेदार, संभाव्य शहरे, तेथील सामन्याची केंद्रे, व्यवस्था, सुविधा याचा विचार करून आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ महासंघाने यजमान म्हणून सिंगापूरला पसंती दिली,'' असे 'फिडे'ने निवेदनात म्हटले आहे.

'जीएसटी'मुळे घराघरांत आनंद!

कर प्रणालीला सात वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त अर्थमंत्रालयाचा दावा

पीटीआय, नवी दिल्ली

वस्तू व सेवा कर (जीएसटी) प्रणालीमुळे घरगुती उपकरणे आणि मोबाइल फोनवरील कर कमी झाला. यामुळे देशातील प्रत्येक घरात आनंदाच्या वातावरणासह, नागरिकांना दिलासाही मिळाला, असा दावा केंद्रीय अर्थमंत्रालयाने सोमवारी या करप्रणालीला सात वर्षे पूर्ण झाल्यानिमित्ताने केला.

विविध १७ प्रकारच्या स्थानिक कर आणि उपकरांना सामावून घेणाऱ्या 'जीएसटी'ची अंमलबजावणी १ जुलै २०१७ रोजी झाली. तिचा सातवा वर्धापनदिन अर्थमंत्रालयाकडून 'सशक्त व्यापार, समग्र विकास' या संकल्पनेच्या आधारे साजरा केला जात आहे.

याबाबत समाजमाध्यमावरील टिप्पणीत मंत्रालयाने म्हटले आहे की, जीएसटीच्या अंमलबजावणीमुळे घरगुती वस्तूंवरील कर कमी झाला. जीएसटीमुळे घरगुती उपकरणे आणि मोबाइल फोनवरील कर कमी होऊन सात वर्षांत प्रत्येक घरात आनंद निर्माण करून दिलासादायक वातावरण निर्माण झाले.

जीएसटी अंमलबजावणीआधी आणि नंतर घरगुती वस्तूंवरील कराचा तुलनात्मक तक्ताही मंत्रालयाने जाहीर केला आहे. त्यात म्हटले आहे की, प्रत्येक कुटुंबाचा खाद्यवस्तू आणि नित्योपयोगी वस्तूंवरील खर्च कमी झाला आहे. यामुळे नागरिकांचे जगणे अधिक सुलभ झाले आहे.

जीएसटीच्या अंमलबजावणीनंतर काय स्वस्त?

- खुल्या रूपात विक्री होणारे गहू, तांदूळ, दही आणि लस्सी यावरील २.५ ते ४ टक्के कर शून्यावर
- सौंदर्यप्रसाधने, मनगटी घड्याळे, सॅनिटरी पॅड, प्लास्टिक उत्पादने, दरवाजे, खिडक्या, फर्निचर आणि गाद्या यावर आधी २८ टक्के असलेला करभार, १८ टक्क्यावंर.
- मोबाइल फोन, २३ इंचापर्यंतचे टीव्ही संच, फ्रीज, वॉशिंग मशीन, गीझर, पंखे यासारख्या विद्युत उपकरणांवर आधी ३१.३ टक्के असलेला कर आता १८ टक्क्यांवर.

> जीएसटी करदात्यांची संख्या एप्रिल २०१८ मध्ये १.०५ कोटी होती. ती यंदा एप्रिलमध्ये १.४६ कोटींवर पोहोचली. करदात्यांच्या संख्येत मोठी वाढ झालेली असून, कर अनुपालनातही वाढ झालेली दिसून येत आहे.
>
> – संजय कुमार अगरवाल, अध्यक्ष, केंद्रीय अप्रत्यक्ष कर व सीमा शुल्क मंडळ

क्रेडिट कार्डच्या शुल्क रचनेत बड्या बँकांकडून बदल

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

मुंबई: एसबीआय कार्ड्ससह एचडीएफसी, आयसीआयसीआय आणि सिटीबँकेसारख्या अनेक बड्या बँकांनी जुलै महिन्यापासून त्यांच्या क्रेडिट कार्ड सेवाविषयक नियमांमध्ये कार्डधारकांसाठी अनेक बदल केले आहेत. त्यात प्रत्येक विनिमयासह मिळणारे बक्षीस गुण अर्थात रिवॉर्ड पॉइंट आणि शुल्कासह इतर बाबींचा समावेश आहे.

एसबीआय कार्डने सरकारशी निगडित क्रेडिट कार्ड विनिमय व्यवहारांवर बक्षीस गुण देणे बंद केले आहे. याचबरोबर तिच्या अन्य काही कार्डावरील सरकारशी निगडित क्रेडिट कार्ड व्यवहारांवर बक्षीस गुण जमा होणे १५ जुलैपासून बंद होईल, अशा कार्डांची सूची तिने वेबस्थळावर प्रसिद्ध केली असून, संबंधित कार्डधारकांनाही सूचित केले आहे.

आयसीआयसीआय बँकेने विविध क्रेडिट कार्ड सेवा शुल्कात बदल केले आहेत. कार्ड बदलण्याचे शुल्क १०० रुपयांवरून २०० रुपये करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे सध्या वसूल केले जाणारे काही प्रकारचे शुल्क पूर्णपणे माफ केले आहेत. धनादेश अथवा रोख रक्कम कार्डधारकांकडून घेऊन जाण्याचे शुल्क, पीओएस व्यवहारावरील चार्ज स्लीप शुल्क, डायल-अ-ड्राफ्ट व्यवहार शुल्क, आऊटस्टेशन धनादेश प्रक्रिया शुल्क, कार्ड स्टेटमेंटची नक्कल प्रत मिळविण्याचे शुल्क यापुढे कार्डधारकांना बँकेने पूर्णपणे माफ केले आहेत.

एचडीएफसी बँकेनेही क्रेडिट कार्डच्या नियमात ग्राहकांसाठी बदल जाहीर केले आहेत. त्यात क्रेड, पेटीएम, चेक, मोबिक्विक आणि फ्रीचार्ज यासारख्या पेमेंट वॉलेटमध्ये पैसे जमा करणाऱ्या ग्राहकांच्या व्यवहारांवर सध्याच्या २.५ टक्क्यांचे शुल्क कमी करून ते १ टक्क्यावर आणले आहे. सुधारित शुल्काची अंमलबजावणी १ ऑगस्टपासून होणार आहे. टाटा न्यू इन्फिनिटी एचडीएफसी बँक क्रेडिट कार्डच्या ग्राहकांना यूपीआय व्यवहारांवर आता ०.५ टक्के 'न्यू कॉइन्स' मिळणार आहेत. ग्राहकाने टाटा न्यू यूपीआय आयडीचा वापर केल्यास कार्डधारकाला आता १ टक्के 'न्यू कॉइन' मिळविता येतील.

ॲक्सिस बँकेने सिटीबँकेच्या क्रेडिट कार्ड ग्राहकांना १५ जुलैपर्यंत पूर्ण समावून घेण्याचे जाहीर केले आहे. याबाबत बँकेने ग्राहकांना ई-मेलद्वारे सूचना दिली आहे. सिटीबँकेच्या ग्राहकांना ॲक्सिस बँकेची नवीन क्रेडिट कार्ड मिळत नाहीत तोपर्यंत त्यांची सध्याची कार्ड्स सुरळीतपणे चालू राहतील. याचबरोबर या ग्राहकांना त्यांच्या कार्डवरील संचित रिवॉर्ड पॉइंट्स कधीही वापरता येतील. मात्र, ॲक्सिस कार्डचा वापर सुरू केल्यानंतर या रिवॉर्ड पॉइंटच्या वैधतेची मुदत तीन वर्षे असेल.

चार 'असियान' देशांशी जलद सीमापार व्यवहारासाठी रिझर्व्ह बँकेचा पुढाकार

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

मुंबई: सीमापार किरकोळ देयक व्यवहारांसाठी नवीन मंच तयार करण्याचा निर्णय रिझर्व्ह बँक आणि आग्नेय आशियाई देशांचा महासंघ अर्थात 'असियान'ने एकत्रितपणे घेतला असून, हा मंच २०२६ पर्यंत सुरू कार्यान्वित होणे अपेक्षित आहे.

रिझर्व्ह बँकेकडून विविध देशांच्या जलद देयक प्रणालींना भारताच्या युनिफाइट पेमेंट इंटरफेस अर्थात यूपीआय या देयक प्रणालीशी संलग्नतेचे प्रयत्न आधीपासूनच सुरू असून, त्या आघाडीवर तिने यशही मिळविले आहे. आता बहुस्तरीय आंतरराष्ट्रीय प्रकल्प 'नेक्सस'मुळे सीमापार किरकोळ व्यवहार त्या त्या देशांतर्गत जलद देयक प्रणालींना जोडून घेऊन शक्य बनविले जाणार आहेत, असे ताज्या उपक्रमासंबंधी रिझर्व्ह बँकेने म्हटले आहे. बँक ऑफ इंटरनॅशनल सेंटलमेंट्सच्या (बीआयएस) नाविन्य केंद्राने 'नेक्सस'ची संकल्पना मांडली आहे. 'असियान'मधील मलेशिया, फिलिपिन्स, सिंगापूर आणि थायलंड या चार देशांसह, भारताचा या अंगाने पहिला सामायिक मंच विकसित केला जाणार आहे. हे सर्व देश या प्रकल्पाचे संस्थापक सदस्य असतील.

बीआयएस आणि संस्थापक देशांच्या मध्यवर्ती बँकांनी याबाबतच्या करारावर स्वाक्षरी केली आहे. स्वित्झर्लंडमध्ये मलेशिया, थायलंड, फिलिपिन्स, सिंगापूरच्या मध्यवर्ती बँकांसोबत रिझर्व्ह बँकेने या करारावर स्वाक्षरी केली. या प्रकल्पात थायलंडचा सुरूवातीच्या टप्प्यापासून समावेश असल्याने तो विशेष निरीक्षक म्हणून जबाबदारी सांभाळेल. या मंचाचा विस्तार पुढे जाऊन आणखी देशांना सामावून घेऊनही केला जाऊ शकतो.

कॉसमॉस बँकेकडून १५ टक्के लाभांश

वार्षिक सर्वसाधारण सभेच्या व्यासपीठावर, डावीकडून कॉसमॉस बँकेच्या व्यवस्थापकीय संचालिका अपेक्षिता ठिपसे, अध्यक्ष मिलिंद काळे आणि उपाध्यक्ष यशवंत कासार.

पुणे: बहुराज्य विस्तार असलेल्या कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह बँकेने २०२३-२४ आर्थिक वर्षासाठी सभासदांना १५ टक्के लाभांशाची घोषणा केली आहे. बँकेची ११८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा, शुक्रवारी (२८ जून) हॉटेल सेंट्रल पार्क, पुणे येथे झाली. नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात बँकेचा एकूण व्यवसाय ३५,४०० कोटींहून अधिक झाला असून, बँकेने ३८४ कोटी रुपयांचा निव्वळ नफा कमावला आहे.

Chola Enter a better life

चोलामंडलम इन्व्हेस्टमेंट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड

कॉर्पोरेट कार्यालय : "चोला क्रेस्ट", सी ५४ व सी ५५, सुपर बी-४, थिरु वि का इंडस्ट्रियल इस्टेट, गुईंडी, चेन्नई-६०० ०३२.

शाखेचा पत्ता : ३०२, ३०३ व ३०४, सह्याद्री बिझनेस पार्क इन्क, तिसरा मजला, पार्क इन्क, त्रिंबक रोड, एमआयसीओ सर्कल, नाशिक-४२२००२.

[रुल ८ (१)] ताबा सूचना
[स्थावर मालमत्तेकरिता]

ज्याअर्थी, **मेसर्स चोलामंडलम इन्व्हेस्टमेंट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड**चे प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रुल्स, २००२च्या रुल ३ यासह वाचलेल्या सेक्शन १३(१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत उक्त सूचनेच्या स्वीकृतीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत **२३.११.२०१८ रोजीप्रमाणे रु. १,२१,८७,३२३.४२/- (रुपये एक कोटी एकवीस लाख सत्याऐंशी हजार तीनशे तेवीस व पैसे बेचाळीस फक्त)** व त्यावरील व्याजासह सूचनेमध्ये नमूद केलेल्या रकमेची परतफेड करण्याकरिता ऋणको **१. विनय वसंत मोडक २. प्रफुल्लता विनय मोडक, ३. मेसर्स निमिश ऑटो कॉर्पोरेशन, ४. शुभांगी वसंत मोडक, सर्वांचा पत्ता** : प्लॉट नं. ११, अभ्युदया सोसायटी, सेंट कॉलनी, गंगापूर रोड, नाशिक-४२२ ०१३ यांच्यावर फर्माविणारी **दिनांकित २३.११.२०१८ मागणी सूचना निर्गमित करण्यात आली आहे. (लोन अकाउंट नं. एक्स०एचईएनएसपी००००११३८७०९, एक्स०एचईएनएसपी००००१७७१७७१)** ऋणको रकमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहेत, याद्वारा ऋणको तसेच आम जनतेस सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटायझेशन प्रकरण क्र. ८२/२०२१ मधील माननीय जिल्हा न्यायदंडाधिकारी, नाशिक यांच्याद्वारा मंजूर झालेल्या दिनांकित ०५.१२.२०२२ आदेशानुसार **२८.०६.२०२४** रोजी मालमत्तेचा **प्रत्यक्ष ताबा** घेतला आहे.

सुरक्षित मत्तेच्या उपलब्ध वेळेत विमोचनाकरिता ॲक्टच्या सेक्शन १३ च्या सब-सेक्शन (८) च्या तरतुदींवर ऋणकोंचे लक्ष वेधीत आहोत. विशेषकरून ऋणको व आम जनतेस याद्वारा सावध करण्यात येते की, त्यांनी मालमत्तेशी कोणताही व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी केलेला कोणताही व्यवहार **२३.११.२०१८ रोजीप्रमाणे रु. १,२१,८७,३२३.४२/- (रुपये एक कोटी एकवीस लाख सत्याऐंशी हजार तीनशे तेवीस व पैसे बेचाळीस फक्त)** व त्यावरील व्याजासह या रकमेकरिता **मेसर्स चोलामंडलम इन्व्हेस्टमेंट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड**च्या आकाराच्या विषयाधीन असणार आहे.

स्थावर मालमत्तेचे वर्णन

प्लॉट नं. ११, मोजमापाचा प्लॉट एरिआ २०९.११ चौ.मी., त्यावरील बांधकाम केलेला बंगलो मोजमापाचा बिल्ट-अप एरिआ ८१.२९६ चौ.मी., "अभ्युदय को-ऑप. हाऊ. सोसा. लि." मधील, गंगापूर रोड, एस.टी. कॉलनीच्या बाजूला, सर्व्हे नं. ७०६/१ए/१/१/११. नाशिक म्युनिसिपल कॉर्पोरेशन, नाशिकच्या मर्यादेत.

दिनांक : ०२.०७.२०२४ स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी
स्थळ : नाशिक, महाराष्ट्र मेसर्स चोलामंडलम इन्व्हेस्टमेंट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड

kotak Kotak Mahindra Bank

Kotak Mahindra Bank Limited

नोंदणीकृत कार्यालय: 27 बीकेसी, सी 27, जी ब्लॉक, बांद्राकुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा(इ) मुंबई- 400051

ताबा सुचना

(अचल संपत्ति करीता) परिशिष्ट IV नुसार व (नियम - 8(1) सह वाचलेल्या जाना-या सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम,2002)

ज्याअर्थी,

अधिकृत अधिकारी म्हणून अधोरक्षाकरी करणारे कोटक महिंद्रा बँक लि. जि बँकिंग नियमन कायदा, 1949 आणि वित्तीय मालमत्तांचे सिक्युरिटाईजेशन आणि रीकन्स्ट्रक्शन ऑफ सिक्यूरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 (''सरफेसी कायदा'') अंतर्गत बँकिंग कंपनी आहे. ज्याचे **नोंदणीकृत कार्यालय 27बीकेसी, सी 27, जी ब्लॉक, बंद्रकुर्ला कॉम्प्लेक्स, बंद्रा (इ), मुंबई-400051 आणि शाखा कार्यालय चौथा मजला, अदमस प्लाझा, 166/16, सीएसटी रोड,कोलीवेरी गाव कुंची कुर्ला नगर, कलीना सांताक्रुज (पूर्व) मुंबई- 400098** येथे. (यापुढे ''बँक/केएमबीएल'' म्हणून संदर्भित) सिक्यूरिटी इंटरेस्ट (अमलबजावणी) नियम, 2002 च्या कलम 13(2) आणि 13(12) अंतर्गत दिलेले अधिकार, व सिक्यूरिटी इंटरेस्ट (इनफोर्समेंट) रुल्स 2002 च्या नियम 8(1) सह वाचले, बँकेने 10/04/2024 रोजी डिमांड नोटीस जारी केली. **मेसर्स. राहुल इंटप्राईजेस प्रोप्रायटर श्री. सचिन कल्यानमल ओस्तवाल (कर्जदार/गहाणदार)** पत्ता: एस एन 535/ए/5, प्लॉट नं. 25, हॉटेल झानकर कंपाउंड, लेबर कोर्ट च्या खाली गंजामल नाशिक- 422003, आणि तसेच रा. फ्लॅट नं. 07, युनियन पार्क को-ऑप हाऊसिंग सोसायटी, प्लॉट नं. 19, सर्वे नं. 533/2/1सी/12, सहाकार नगर, महानगर गार्डन समोर, गंजमल, नाशिक, ता आणि जि. नाशिक, आणि तसेच रा. फ्लॅट नं. बी-1, युनियन पार्क को-ऑप हाऊसिंग सोसायटी मार्केट यार्ड जवळ, भारत पेट्रोल पंप मागे, डिंडोरी रोड पंचवटी नाशिक, ता. आणि जि. नाशिक, **2. श्री. सचिन कल्यानमल ओस्तवाल (सह-कर्जदार)** यांचा पत्ता:- फ्लॅट नं. 07, युनियन पार्क को-ऑप हाऊसिंग सोसायटी, प्लॉट नं. 19, सर्वे नं. 533/2/1सी/12, सहाकार नगर, महानगर गार्डन समोर, गंजमल, नाशिक, ता आणि जि. नाशिक आणि तसेच रा. फ्लॅट नं. बी-1, युनियन पार्क को-ऑप हाऊसिंग सोसायटी, मार्केट यार्ड जवळ, भारत पेट्रोल पंप मागे, डिंडोरी रोड, पंचवटी नाशिक, ता आणि जि. नाशिक. **3. श्रीमती. शोभा कांतीलाल चोरडिया (सह-कर्जदार)** यांचा पत्ता:- फ्लॅट नं. बी-1, युनियन पार्क को-ऑप हाऊसिंग सोसायटी, मार्केट यार्ड जवळ, भारत पेट्रोल पंप मागे, डिंडोरी रोड, पंचवटी नाशिक, ता आणि जि. नाशिक. **आणि तसेच रा.** फ्लॅट नं. 07, युनियन पार्क को-ऑप हाऊसिंग सोसायटी, प्लॉट नं. 19, सर्वे नं. 533/2/1सी/12, सहाकार नगर, महानगर गार्डन समोर, गंजमल, नाशिक, ता आणि जि. नाशिक, **4. श्रीमती. सोनल सचिन ओस्तवाल (सह-कर्जदार/गहाणदार)** यांचा रा. फ्लॅट नं. 07, युनियन पार्क को-ऑप हाऊसिंग सोसायटी, प्लॉट नं. 19, सर्वे नं. 533/2/1सी/12, सहाकार नगर, महानगर गार्डन समोर, गंजमल, नाशिक, ता आणि जि. नाशिक. **आणि तसेच रा.** फ्लॅट नं. बी-1, युनियन पार्क को-ऑप हाऊसिंग सोसायटी, मार्केट यार्ड जवळ, भारत पेट्रोल पंप मागे, डिंडोरी रोड, पंचवटी नाशिक, ता आणि जि. नाशिक. नोटीसमध्ये नमूद केलेली एकूण रक्कम **रु. 1,09,89,602.87/- (रुपये एक कोटी नऊ लाख एकोणनव्वद हजार सहाशे दोन आणि सत्साऐंशी पैसे फक्त) 04/04/2024** रोजी देय, (विशेषत: लोन अकाउंट नं. **1212566384** सीआरएन नं. 212136272 , पुढील व्याजासह परतफेड करण्यासाठी 05/04/2024 पासून चक्रवाढ व्याजाच्या पायावर करारानुसार शुल्क आकारले जाईल (''थकबाकीची रक्कम'') सदर मागणी नोटीस प्रकाशित झाल्यापासून 60 दिवसांचा आत भरपाई करण्याच्या उद्देश्याने सुचना मध्ये दर्शविलेल्या तारखेला दिली आहे. उपरोक्त कर्जदार/सह-कर्जदार परत करण्यात अयशस्वी ठरल्याने, याद्वारे कर्जदार/सह-कर्जदार आणि सर्वसाधारणपणे जनतेला याव्दारे सुचना देण्यात येते की, खाली स्वाक्षरीदाराने त्याला/तिला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा SARFAESI कायदयाच्याकलम 13(4) अन्वये वरील सांगितलेल्या नियमांच्या नियम 8 अंतर्गत **28 जुन 2024** या दिवशी **सांकेतिक ताबा** घेतला आहे.

येथे नमूद केलेल्या कर्जदार/सह-कर्जदाराने विशेषत: आणि सर्वसाधारणपणे जनतेला सावध केले जाते की मालमत्तेचा व्यवहार करु नये आणि मालमत्तेशी कोणताही व्यवहार केल्यास कोटक महिंद्रा बँक लिमिटेड च्या शुल्काच्या अधीन असेल, ज्याच्या **शाखा कार्यालय चौथा मजला, अदमस प्लाझा, 166/16, सीएसटी रोड,कोलीवेरी गाव कुंची कुर्ला नगर, कलीना सांताक्रुज (पुर्व) मुंबई- 400098** येथे. रक्कमेसाठी **रु. 1,09,89,602.87/- (रुपये एक कोटी नऊ लाख एकोणनव्वद हजार सहाशे दोन आणि सत्साऐंशी पैसे फक्त) 04/04/2024** रोजी देय, (विशेषत: लोन अकाउंट नं. **1212566384** सीआरएन नं. 212136272, रोजी एकत्रितपणे देय आहे, कंपाउंड इंटरेस्ट पुढील व्याज आणि त्यावरील इतर शुल्क करारानुसार आकारले जाईल 05/04/2024 पासून पूर्ण परतफेड आणि/किंवा वसूलीच्या तारखेपर्यंत व्याज आणि पर्यायी व्याज, आनुषंगिक खर्च, खर्च, आणि शुल्क, इ. सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी, उपलब्ध वळेच्या संदर्भात, कायद्याच्या कलम 13 च्या उपकलम (8) च्या तरतुदींकडे कर्जदारांचे लक्ष आमंत्रित केले आहे.

अचल संपत्तीचे विवरण

संपत्ती नं. 1: रहिवासी फ्लॅट नं. 07, पहिला मजला,''युनियन पार्क को-ऑपरेटिव हाऊसिंग सोसायटी लिमीटेड., प्लॉट नं. 19, येथे बांधलेले सर्वे नं. 533/2/1सी/12, सहकार नगर, महानगर गार्डन समोर, गंजमल नाशिक, ता. आणि जि. नाशिक, फ्लॅट एरिया क्षेत्रफळ- 50.16 चौ. मी संपत्ती नं. 2: रहिवासी फ्लॅट नं. बी-1 तळ मजला''पुष्पवील्ला को-ऑपरेटिव हाऊसिंग सोसायटी लि. प्लॉट नं. 08 + 09, सर्वे नं. 108/ए/5/4+ 108/ए/5/5/7 मार्केट यार्ड जवळ, भारत पेट्रोल पंप मागे, डिंडोरी रोड, पंचवटी, नाशिक ता. आणि जि. नाशिक फ्लॅट एरिया क्षेत्रफळ 55.36 चौ.मी (बिल्ट अप एरिया 69.20 चौ.मी फक्त) चतुर्सिमा:- संपत्ती क्र 2:- पूर्व: फ्लॅट नं. बी2 व जोडलेल्या पाय-या, पश्चिम: फ्लॅट नं. बी1 ची रिक्त जागा, दक्षिण: फ्लॅट नं. बी1 ची रिक्त जागा, उत्तर: पाय-या आणि रिक्त जागा

प्राधिकृत अधिकारी,
(श्रीमती. श्वेता कामठ- सहयोगी उपाध्यक्ष कायदेशीर
कोटक महिंद्रा बँक. लिमी.

दिनांक : 28/06/2024
ठिकाण : मुंबई

OMKARA ASSETS RECONSTRUCTION PVT. LTD.

ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड

कॉर्पोरेट कार्यालय : कोहिनूर स्क्वेअर, ४७वा मजला, एन.सी. केळकर मार्ग, आर.जी. गडकरी चौक, दादर (पश्चिम), मुंबई-४०००२८. संपर्क क्र. : ९७७३४०६१७५.

स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना

[रुल ९(१) यासह वाचलेल्या ८(६)च्या तरतुदी पाहा]

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या रुल ९(१) यासह वाचलेल्या रुल ८(६) च्या तरतुदीसह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना

याद्वारा आम जनतेस आणि विशेषकरून ऋणको **मेसर्स आडगावकर सराफ प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापन अंतर्गत कंपनी), श्री. राम एस. आडगावकर (सह-ऋणको व गहाणकार) व लव आडगावकर (सह-ऋणको) व कुश आडगावकर (ऋणको) व शाम शशिकांत आडगावकर (सह-ऋणको व गहाणकार)** यांना सूचना देण्यात येते की, याखालील वर्णिलेली स्थावर मालमत्ता सुरक्षित धनकोकडे गहाण आहे/ ता